■ RNI NO. MAHMAR/25/A3029

■ लातूर

■ वर्ष : ७ वे, अंक नं. : ९६

■ दि.०५ ऑगस्ट २०२६, वार : बुधवार

■ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक
# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रमात बदल, अंतिम मतदारयादी आता २७ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमाच्या वेळापत्रकात सुधारणा केली आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांच्यामार्फत घरोघरी भेटीचा कार्यक्रम ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण व पुनर्रचना १७ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण करण्यात येईल.

मतदारयादीचा प्रारूप मसुदा २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल. त्यानंतर २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. प्राप्त दावे व हरकतींवर सुनावणी आणि निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पार पडेल.

सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदारयादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल, असे भारत निवडणूक आयोगामार्फत कळविण्यात आले आहे.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा राजमाता जिजामाता संकुलातर्फे सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :**विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याला पुण्यातील द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्यावतीने 'बेस्ट शुगर फॅक्टरी-२०२६' हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मांजरा परिवाराचे साखर कारखाने उत्तम रितीने वाटचाल करीत आहेत. या कारखान्यांकडून सर्वाधिक ऊस दरासह पारदर्शक कारभार सुरु आहे. मांजरा कारखान्याने मागील तीन वर्षांच्या काळात कारखाना कार्यक्षेत्रातील उसाची तोड १०० टक्के केवळ हार्वेस्टरने केली असून देशातील हा पहिला कारखाना ठरला आहे. याबद्दल द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्यावतीने या कारखान्याला 'बेस्ट शुगर फॅक्टरी-२०२६' हा पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते दिलीपराव देशमुख यांचा 'आशियाना' निवासस्थानी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## प्रवीण टाके छत्रपती संभाजीनगरच्या माहिती उपसंचालक पदावर रुजू

**छत्रपती संभाजीनगर:** माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी सोमवारी छत्रपती संभाजीनगर विभागाचे माहिती उपसंचालक या पदाचा कार्यभार स्वीकारला.

प्रवीण टाके यापूर्वी कोल्हापूर येथे उपसंचालक म्हणून कार्यरत होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात २००८ ला रुजू झाल्यानंतर त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यानंतर मुंबई मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना 'लोकराज्य'चे ते कार्यकारी संपादक होते. चंद्रपूर, नागपूर व नांदेड याठिकाणी त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्य केले आहे. शासन सेवेत केलेल्या उल्लेखनीय कामासाठी त्यांना सन २०१९ - २० वर्षाचा यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे.

# अनिल देशमुखांवर 'मनी लॉंड्रिंग'चा खटला चालवण्यास 'ईडी'ला राज्यपालांची मंजुरी

**मुंबई/प्रतिनिधी :** बार आणि रेस्टॉरंटमधून कथित १०० कोटी रुपयांच्या खंडणी वसुलीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरोधात खटला चालवण्यासाठी सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) महाराष्ट्राच्या राज्यपालांकडून मंजुरी मिळाली आहे. राज्यपालांच्या या निर्णयामुळे 'पीएमएलए' कायद्यांतर्गत देशमुखांवर न्यायालयात आरोप निश्चिती आणि खटल्याची पुढील प्रत्यक्ष सुनावणी सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



सोमवारी मुंबईतील विशेष पीएमएलए न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी पार पडली. या वेळी 'ईडी'चे विशेष सरकारी वकील सुनील गोन्साल्विस यांनी न्यायालयाला माहिती दिली की, राज्यपालांनी २१ मे २०२६ रोजीच देशमुखांवर खटला चालवण्यासाठी आवश्यक असलेली मंजुरी दिलेली आहे. या मंजुरीचे पत्रही ईडीतर्फे न्यायालयात सादर करण्यात आले.

हे प्रकरण २० मार्च २०२१ रोजी मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठवलेल्या पत्रावरून उघडकीस आले होते. निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझे व इतरांना मुंबईतील बार व रेस्टॉरंटकडून दरमहा १०० कोटी रुपयांची वसुली करण्याचे लक्ष्य देशमुखांनी दिल्याचे गंभीर आरोप सिंग यांनी पत्रात केले होते. यानंतर केंद्रीय यंत्रणांकडून या प्रकरणाची चौकशी सुरू झाली होती. - दरम्यान, राज्यपालांच्या या मंजुरीवर अनिल देशमुख यांनी प्रतिक्रिया व्यक्त करत सरकार आणि तपास यंत्रणांवर आरोप केला आहे. अँटेलिया स्फोटके आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरणाचे मुख्य सूत्रधार परमबीर सिंगच असल्याचे राज्य दहशतवाद विरोधी पथकाच्या (एटीएस) तपासात उघड झाले होते, म्हणूनच आपण त्यांची दुय्यम पदावर बदली केली होती. या वैयक्तिक सूडभावनेतूनच सिंग यांनी आपल्यावर १०० कोटींच्या वसुलीचा खोटा आरोप केला, असा दावा देशमुखांनी 'एक्स'वर केला.

- पुढे या प्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एनआयए) वर्ग झाल्यानंतरही, कटाची सूत्रे परमबीर सिंग यांच्याच कार्यालयात शिजल्याचे उघड झाले होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांनी एका आरोपीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना एनआयएच्या भूमिकेवर गंभीर ताशेरे ओढले होते. एवढे भक्कम पुरावे आणि न्यायालयाचे ताशेरे असतानाही 'एनआयए'ने परमबीर सिंग यांना आरोपी का केले नाही, असा सवाल करत देशमुखांनी राजकीय सूडबुद्धीने कारवाई केली जात असल्याचा आरोप केला आहे.

## एमएमआरडीए मेट्रोचा नवा विक्रम! ३० कोटी प्रवाशांचा टप्पा पार; अवघ्या १७९ दिवसांत शेवटचे ५ कोटी प्रवासी

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) संचलित मेट्रो नेटवर्कने ३० कोटी प्रवाशांचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. मेट्रो मार्गिका २अ (दहिसर पूर्व-अंधेरी पश्चिम), मार्गिका ७ (दहिसर पूर्व-गुंदवली), मार्गिका २ब (डायमंड गार्डन-मंडाळे, टप्पा-१) आणि मार्गिका ९ (दहिसर पूर्व-काशीगाव, टप्पा-१) या मार्गावर ३ ऑगस्ट २०२६ रोजी हा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला. सुरक्षित, वेगवान आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक म्हणून मुंबईकरांनी मेट्रोला दिलेल्या वाढत्या पसंतीचे हे प्रतीक मानले जात आहे. या कामगिरीतील विशेष बाब म्हणजे शेवटचे ५ कोटी प्रवासी अवघ्या १७९ दिवसांत नोंदवले गेले, जो आतापर्यंतचा सर्वात वेगवान टप्पा ठरला आहे. या कालावधीत सरासरी दैनंदिन प्रवासीसंख्या २.७० लाखांवरून २.७९ लाखांपर्यंत पोहोचली असून, त्यात ३.३३ टक्क्यांची वाढ झाली आहे. शनिवार-रविवार, सार्वजनिक सुट्ट्या आणि हंगामी प्रवासाचा परिणाम असूनही ही वाढ कायम राहिल्याचे एमएमआरडीएने सांगितले.

२ एप्रिल २०२२ रोजी मेट्रो मार्गिका २अ आणि ७ सुरू झाल्यानंतर प्रवासीसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. त्यानंतर ७ एप्रिल २०२६ रोजी मार्गिका २ब (टप्पा-१) आणि मार्गिका ९ (टप्पा-१) सुरू झाल्याने नेटवर्कमध्ये नऊ नवीन स्थानकांची भर पडली आणि संपर्कक्षमता आणखी मजबूत झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० कोटी प्रवाशांचा टप्पा हा मुंबईकरांनी आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर व्यक्त केलेल्या विश्वासाचा पुरावा असल्याचे सांगितले. उपमुख्यमंत्री तथा एमएमआरडीएचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांनीही हा टप्पा जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे नमूद करत, भविष्यात संपूर्ण मुंबई महानगर प्रदेश अखंड मेट्रो नेटवर्कने जोडण्याचा संकल्प व्यक्त केला.

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी मेट्रो सेवा सुरक्षित, विश्वासार्ह आणि जागतिक दर्जाची ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. त्यांनी हा ऐतिहासिक टप्पा मेट्रोवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला समर्पित असल्याचे सांगितले.

## २० वर्षांचा सामाजिक अनुभव पक्षाच्या कामाला येणार; शिरीष देवकते लातूर लोकसभा अध्यक्ष

**लातूर/प्रतिनिधी :**राष्ट्रीय समाज पक्षाच्या लातूर लोकसभा अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते शिरीष नरसिंगराव देवकते यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष काशिनाथ साधू शेवते यांनी त्यांना अधिकृत नियुक्ती पत्र प्रदान केले.

देवकते यांच्या पक्ष प्रवेशामुळे आणि नव्या जबाबदारीमुळे लातूर जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर राष्ट्रीय अध्यक्ष शिवलिंगप्पा किन्नुर नेते महादेवजी जानकर यांच्या ध्येय-धोरणांनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. देवकते यांच्या तीव्र



इच्छाशक्तीची आणि कामाची दखल घेऊन पक्षाने त्यांच्या खांद्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे.

या नियुक्तीनंतर बोलताना शिरीष देवकते यांनी पक्षाचे नियम आणि अटींचे पालन करून पक्षवाढीसाठी प्रामाणिकपणे काम करणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. लातूर लोकसभा मतदारसंघात पक्षाची पाळेमुळे घट्ट करण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. त्यांच्या निवडीमुळे लातूर भागात राष्ट्रीय समाज पक्षाला मोठी ताकद मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**२० वर्षांचा संघर्ष आणि सामाजिक लढा**

नवनियुक्त लोकसभा अध्यक्ष शिरीष नरसिंगराव देवकते यांचा सामाजिक क्षेत्रातील प्रवास अत्यंत मोठा आणि संघर्षाचा राहिला आहे. त्यांनी गेल्या २० वर्षांत सामाजिक क्षेत्रात सक्रिय राहून विविध स्थानिक आणि जनहितार्थ विषयांवर तीव्र लढे उभारले आहेत. सर्वसामान्यांचे हक्क, गोरगरिबांचे प्रश्न आणि नागरी समस्या सोडवण्यासाठी त्यांनी नेहमीच अग्रभागी राहून काम केले. त्यांच्या या दीर्घकालीन सामाजिक अनुभवाचा आणि दांडग्या जनसंपर्काचा फायदा आता राष्ट्रीय समाज पक्षाला लातूर लोकसभा मतदारसंघात पक्षविस्तारासाठी मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्यांच्या याच अनुभवाचा आदर करत पक्षाने ही महत्त्वाची जबाबदारी दिली आहे.

## नागरिकाभिमुख विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी विविध उपाययोजनांवर भर- राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**मुंबई/प्रतिनिधी :** नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत विकास प्रक्रियेतील अडथळे दूर करणे, पुनर्विकास प्रकल्पांना अधिक गती देणे, नियोजन प्रक्रियेत सुसूत्रता आणणे आणि आवश्यक त्या ठिकाणी नियम व कार्यपद्धती अधिक परिणामकारक करण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्याचे निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

पुणे महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कार्यक्षेत्रातील पुनर्विकास, नगररचना, वाहतूक नियोजन आणि विकास आराखड्याशी संबंधित विविध विषयांवर मंत्रालयात राज्यमंत्री (नगर विकास) माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली.

या बैठकीस पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त अभिजित चौधरी, पुणे महानगरपालिकेचे शहर अभियंता पावसकर, महाप्रीत चे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, सहसचिव तथा संचालक नगररचना सुलेखा वैजापूरकर, मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनचे पदाधिकारी तसेच विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनने सादर केलेल्या निवेदनातील विविध विषयांचा सविस्तर आढावा घेऊन त्यावरील उपाययोजना, धोरणात्मक बाबी आणि कार्यवाहीच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा



करण्यात आली.

राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की, नगरविकासाशी संबंधित धोरणे व निर्णय नागरिककेंद्रित, परिणामकारक आणि विकासाला चालना देणारे असावेत. प्रत्येक विषयाचा सर्वांगीण दृष्टिकोनातून सखोल विचार करून त्यामागील उद्दिष्ट प्रभावीपणे साध्य होणे आवश्यक आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखत वृक्षसंवर्धनाला प्राधान्य देण्यावरही राज्यमंत्री मिसाळ यांनी भर दिला. बैठकीत पुणे शहरातील पुनर्विकास प्रकल्पांमधील रस्ते रुंदीकरण, हस्तांतरणीय विकास हक्क व नगर नियोजन रस्ते विकासाला गती देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील प्रोत्साहनपर चटई क्षेत्र निर्देशांक तरतुदी, स्वयं पुनर्विकास प्रकल्पांना प्रोत्साहन, तसेच पुणे महानगर प्रदेशाच्या संरचनात्मक आराखड्याअंतर्गत रस्ते, आरक्षणे, क्षेत्र नियोजन आणि नगर नियोजन योजनांचा आढावा घेण्यात आला.

विकास प्रक्रियेला अधिक गती, सुसूत्रता आणि पारदर्शकता मिळावी, यासाठी संबंधित विषयांचा आवश्यक अभ्यास करून कार्यवाही करण्याचे निर्देश राज्यमंत्री मिसाळ यांनी दिले.

## शिंदेंच्या बालेकिल्ल्यात 'कोयता पॅटर्न'! ठाण्यातील 'कॅनन' हॉटेलवर हल्ला; मॅनेजरला मारून टाकण्याची धमकी

**ठाणे/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या ठाणे शहरात गुन्हेगारांचे मनोबल पुन्हा एकदा वाढल्याचे चित्र समोर आले आहे. ठाणे पश्चिम रेल्वे स्थानकालगत असलेल्या प्रसिद्ध 'हॉटेल कॅनन'मध्ये एका माथेफिरूने कोयत्याचा धाक दाखवत तुफान तोडफोड केली आणि दोन हजार रुपयांच्या हप्त्यासाठी थेट मॅनेजरला जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे परिसरातील व्यावसायिक आणि नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. ठाणे पश्चिम रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या प्रसिद्ध हॉटेल कॅननमध्ये ही घटना घडली. आरोपीने हातात कोयता घेऊन हॉटेलमध्ये थेट प्रवेश केला. हॉटेलमध्ये शिरताच त्याने तेथील काचा, फर्निचर आणि इतर साहित्याची तोडफोड करण्यास सुरुवात केली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे हॉटेलमधील ग्राहक आणि कर्मचाऱ्यांची पळापळ झाली.

# भूजल संवर्धनासाठी माहितीचा प्रभावी वापर करावा - अपर जिल्हाधिकारी करमरकर

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय भूजल बोर्डाने भूजल माहितीच्या प्रसारासाठी, डेटा पोर्टल्सची उत्तम निर्मिती केली आहे. त्यानुसार जिल्हास्तरीय नियोजन, जलसंपदा व्यवस्थापन आणि भूजल संवर्धनासाठी संबंधित विभागांनी या माहितीचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी केले.

केंद्रीय भजल बोर्ड (सीजीडब्ल्यूबी), मध्य क्षेत्र, नागपूर यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे सीजीडब्ल्यूबीच्या भूजल माहितीचा तसेच जलभृत (Aquifer) नकाशांकन अभ्यासांचा प्रसार व उपयोग या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्रीमती करमरकर होत्या.

### भूजल माहिती व जलभृत नकाशांकनावर कार्यशाळा

कार्यशाळेस भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, मृद व जलसंधारण विभाग, जलसंपदा विभाग, पाणलोट विकास विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, लघु पाटबंधारे विभाग, कृषी विभागासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीस केंद्रीय भूजल बोर्डाचे वैज्ञानिक हितेश रामटेके यांनी विचार मांडले. त्यानंतर वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (भूजलशास्त्र) उज्ज्वल कुमार यांनी राष्ट्रीय जलभृत नकाशांकन व व्यवस्थापन (NAQUIM) अंतर्गत लातूर जिल्ह्यातील अभ्यास आणि त्यातील



निष्कर्षांचे सादरीकरण केले. यावेळी हितेश रामटेके यांनी केंद्रीय भूजल बोर्डाने विकसित केलेल्या ग्राऊंड वॉटर डेटा डाउनलोड पोर्टल आणि INGRES सह विविध ऑनलाइन डेटा पोर्टल्सची माहिती दिली. भूजलविषयक माहितीचा प्रभावी वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले.तसेच वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी लातूर जिल्हा भूजल मुल्यांकन अहवाल व वापराबाबत माहिती दिली.

कार्यशाळेत राष्ट्रीय जलभृत नकाशांकन व व्यवस्थापन अहवाल-लातूर जिल्हा या अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. वरिष्ठ तांत्रिक सहायक (भूजलशास्त्र) उज्ज्वल कुमार यांनी आभार मानले.

## संपादकीय...

### सूर्याचा पाठलाग करणारे 'स्मार्ट' सोलर जनरेटर!

अंगावर रोमांच आणणारे ट्रेकिंग, निसर्गाच्या कुशीतील कॅम्पिंग आणि शहराच्या धकाधकीपासून दूर जाऊन शांततेत काम करणे, आजकालच्या डिजिटल नोमॅड्स आणि पर्यटकांना अशा भटकंतीचे भारी वेड! पण हिरव्यागार जंगलात किंवा डोंगराच्या कुशीत गेल्यावर मोबाईल, लॅपटॉप अथवा कॅमेऱ्याची बॅटरी संपली की, आनंदाचा पार विरस होतो. बाजारात पोर्टेबल सोलर पॅनल्स मिळतात खरे; पण आकाशात सूर्य जसजसा पुढे सरकतो, तसतशी या पॅनल्सची दिशा हाताने बदलावी लागते; अन्यथा चार्जिंगचा वेग मंदावून वेळ वाया जातो. या त्रासावर कायमचा पडदा पाडण्यासाठी आणि रिन्युएबल एनर्जीच्या दुनियेत नवा पायंडा पाडण्यासाठी 'गॅजेट वर्ल्ड'मध्ये एक भन्नाट 'पोर्टेबल सोलर जनरेटर' अवतरला आहे. सूर्य जसजसा आकाशात प्रवास करेल, तसतशी स्वतःची दिशा आपोआप बदलण्याची अद्भुत जादू या गॅजेटमध्ये आहे! या उपकरणाची सर्वात मोठी करामत म्हणजे यातील 'ड्युअल क्सिस जीपीएस'वर चालणारी स्वयंचलित सोलर ट्रॅकिंग सिस्टीम. हे गॅजेट उघड्या छताखाली किंवा बागेत ठेवताच, सूर्याची किरणे कुठे पडत आहेत याचा अचूक मागोवा घेऊन यातील सोलर पॅनल सकाळी सूर्योदयापासून ते संध्याकाळी सूर्यास्तापर्यंत आपोआप सूर्याच्या दिशेने झुकत आणि फिरते. पारंपरिक किंवा एकाच जागी राहणाऱ्या सोलर पॅनल्सच्या तुलनेत, हे स्मार्ट तंत्रज्ञान तब्बल ४० टक्के जास्त वीज निर्माण करते. सूर्याचे एकेक किरण शोषून घेऊन बॅटरी वेगाने चार्ज करण्याचे कसब यात आहे. या गॅजेटचे डिझाईन वायरलेस आणि पोर्टेबल बनवले आहे. यात ३२ वॅटचे आकर्षक अष्टकोनी सोलर पॅनल असून, ते कोणत्याही वायरच्या कटकटीशिवाय केवळ चुंबकीय शक्तीने मुख्य मोटर आणि बॅटरीशी जोडले जाते. त्यामुळे अवघ्या एका मिनिटात हे उपकरण सेट करून वापरण्यासाठी सज्ज होते. लहरी हवामानाचा सामना करण्यासाठी हे गॅजेट पूर्णपणे वॉटरप्रूफ आणि दणकट आहे. प्रवासाला निघताना यातील सुटे भाग वेगळे करून लहानशा बॅगेत सहज घेऊन जाता येतात. उपकरणाच्या गोल आकाराच्या मुख्य मॉड्यूलमध्ये २७० वॅट प्रतितास क्षमतेची अवाढव्य बॅटरी दिली आहे. ज्यामुळे सूर्य मावळल्यानंतर रात्री तुमची गॅजेट्स सहज चार्ज होतात. यात १०० वॅटचे दोन यूएसबी सी फास्ट-चार्जिंग पोर्ट्स आणि एक यूएसबी ए पोर्ट आहे. याच्या मदतीने लॅपटॉप, स्मार्टफोन, ड्रोन कॅमेरे, टॅबलेट आणि अगदी जंगलात सॅटेलाईट इंटरनेट पुरवणारे स्टारलिंक मिनीदेखील सहज चालवता येते. छोटा एलईडी इंडिकेटर बॅटरीची रिअल टाईम पातळी दाखवत राहतो. स्मार्ट युगात या उपकरणाला मोबाईल ॲपचीही जोड दिली आहे. ॲपद्वारे सोलर पॅनल सध्या किती पॉवर तयार करत आहे, बॅटरी किती टक्के शिल्लक आहे आणि गॅजेटचे अचूक जीपीएस लोकेशन काय, यावर लांबूनही थेट नजर ठेवता येते. अचानक वीज गेलेल्या काळात, निसर्गाच्या कुशीत फिरताना किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत हे गॅजेट एका अभेद्य डिजिटल पॉवर स्टेशनसारखे काम करते. सध्या या पोर्टेबल सोलर जनरेटरची किंमत ४९९ डॉलर्सच्या आसपास आहे. जी भारतीय चलनात अंदाजे ४७ हजार रुपयांच्या घरात जाते.

# मंत्रिमंडळ निर्णय




(कृषी व पदुम विभाग)

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेस आणखी तीन वर्षांची मुदतवाढ**
**योजनेत भूमिहीन शेतमजूर व महिला शेतकऱ्यांचा समावेश होणार**
**शेतकरी, शेतमजूरांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांचा योजनेत समावेश**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेस आणखी तीन वर्षांची मुदतवाढ देण्यास तसेच या योजनेत पात्र भूमिहीन शेतमजूर व महिला शेतकऱ्यांचा समावेश करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यापूर्वी ही योजना कुटुंबातील दोनच सदस्यांना लागू होती, आता ही योजना शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना लागू होणार आहे.

शेती करतांना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा धक्का बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, तसेच, अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात, यामुळे मृत्यू ओढवतो किंवा अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस किंवा त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व शेतकरी व खातेदार म्हणून नोंद नसलेल्या, शेतकऱ्याच्या कुटुंबातील १० ते ७५ वर्ष वयोगटातील कोणताही १ सदस्य (आई-वडील, शेतकऱ्याची पति/पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) अशा एकूण २ जणांकरिता २०२३-२४ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत होती. यात मृत्यू आणि अपंगत्व आल्यास दोन लाख ते एक लाखांपर्यंतची आर्थिक मदत देण्यात येते.

आता या योजनेस ३१ मार्च २०३१ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. शेतीमध्ये प्रत्यक्ष राबणाऱ्या भूमिहीन शेतमजूरांचा वाटा मोठा असून, कामाच्या ठिकाणी त्यांनाही अपघाताचा धोका असतो. भूमिहीन शेतमजूरांचा अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवते. ही बाब विचारात घेता, या योजनेचे संरक्षण भूमिहीन शेतमजुरांनाही देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत 'महिला शेतकरी' म्हणून प्रमाणपत्र मिळालेल्या महिला शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

योजनेत अपघातामुळे झालेला अंतर्गत रक्तस्त्राव आणि उष्माघात या अपघातांचा नव्याने समावेश करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. योजनेसाठी यापुढे अपीलिय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी यांच्या ऐवजी अपर जिल्हाधिकारी राहतील. तसेच या योजनेत आर्थिक मदतीसाठीचा प्रस्ताव स्वीकारण्यासाठी दोन महिन्यांची मुदत राहणार आहे.

आर्थिक मदत थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल. त्यासाठी इंटिग्रेटेड ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

००

(ऊर्जा विभाग)

**मुंबईतील शासकीय कार्यालयांसाठी बेस्टची संयुक्त वीज बिलिंग प्रणाली**

मुंबई शहरातील राज्य शासनाच्या तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय कार्यालयांसाठी बेस्ट उपक्रमाची संयुक्त वीज बिलिंग प्रणाली लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच १ एप्रिल २०२६ पासून सर्व शासकीय वीज जोडण्या प्रीपेड पद्धतीमध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार, सर्व विभागांना ३० दिवसांच्या आत संयुक्त बिलिंग पोर्टलवर नोंदणी व वीज जोडण्यांच्या माहितीची पडताळणी पूर्ण करावी लागणार आहे. वित्त विभाग आगाऊ निधी वितरणाची कार्यपद्धती निश्चित करणार असून ऊर्जा विभाग तिमाही ताळमेळाची प्रक्रिया राबविणार आहे.

संयुक्त बिलिंग प्रणालीमुळे सर्व वीज जोडण्यांची देयके एकाच व्यासपीठावरून भरता येणार असून, ऑटो-डेबिट सुविधेमुळे बिल भरण्यास होणारा विलंब, त्यावरील व्याज व दंड टाळता येणार आहे. तसेच सर्व जोडण्यांची बिले, वीज वापर, थकबाकी, व्यवहार आणि व्यवस्थापकीय माहिती () एकाच डॅशबोर्डवर उपलब्ध होणार आहे. 'गो ग्रीन' सुविधेमुळे प्रत्येक बिलावर सवलत मिळणार असून, प्रीपेड जोडण्यांवर लागू दरानुसार सवलतीचाही लाभ मिळणार आहे.

सध्या बेस्टच्या प्राधिकृत कोड प्रणालीअंतर्गत ३२२ गटांतील १०,०१७ ग्राहक आणि राज्य शासनाचे १०४ गटांतील ८६९ ग्राहक असून, त्यांना या नव्या प्रणालीचा लाभ मिळणार आहे. आवश्यकतेनुसार नवीन गटही तयार करता येणार आहेत.

या प्रणालीमुळे वीज देयके वेळेत भरली जाऊन विलंब शुल्क व १२ ते १५ टक्के व्याजाचा अतिरिक्त आर्थिक भार टळणार आहे. तसेच बिल तपासणी, निधी उपलब्धता, देयक प्रक्रिया आणि ताळमेळासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची बचत होऊन शासकीय कामकाज अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, विभागीय नोंदणी, ग्राहक पडताळणी, निधी उपलब्धता, तिमाही ताळमेळ आणि प्रणालीचे 'गो-लाईव्ह' अशा चार टप्प्यांत प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. बेस्ट उपक्रमाकडून माहिती-तंत्रज्ञान सुविधा, डॅशबोर्ड, व्यवस्थापकीय माहिती आणि तक्रार निवारणाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

००

(सामान्य प्रशासन विभाग)

**राज्य माहिती आयोगात तीन अतिरिक्त आयुक्त**
**प्रलंबित अपीलाचा जलद निपटारा होणार**

राज्य माहिती आयोगाकडे प्रलंबित असलेल्या अपिलांचा जलद निपटारा करण्यासाठी बृहन्मुंबई, नाशिक आणि अमरावती खंडपीठांमध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी तीन अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार, प्रत्येक खंडपीठासाठी एक उप सचिव आणि एक कक्ष अधिकारी अशी प्रतिनियुक्तीवरील पदे निर्माण करण्यात येणार आहेत. तसेच एक लघुलेखक, एक लिपिक-टंकलेखक आणि एक शिपाई ही पदे बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने भरली जाणार आहेत. अशाप्रकारे तीनही खंडपीठांसाठी एकूण १८ पदे निर्माण करण्यात येणार आहेत.

प्रलंबित अपिलांची संख्या कमी झाल्यास आवश्यकतेनुसार अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांना इतर खंडपीठांमध्ये नियुक्त करण्याचे अथवा काही द्वितीय अपीले त्यांच्या कार्यक्षेत्रात हस्तांतरित करण्याचे अधिकार राज्य मुख्य माहिती आयुक्तांना देण्यात आले आहेत. बाह्य यंत्रणेमार्फत पदे भरताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे राज्य माहिती आयोगातील प्रलंबित द्वितीय अपिलांच्या निपटाऱ्याला गती मिळून नागरिकांना माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अपिलांवर अधिक जलद आणि प्रभावी न्याय मिळण्यास मदत होणार आहे.

००

(विधि व न्याय विभाग)

**सिल्लोड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासह सरकारी वकील कार्यालय**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच सरकारी वकील कार्यालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या न्यायिक अधिकारी व सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या पदांमधून या न्यायालयासाठी जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्या एक पदासह न्यायालयासाठी २० नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच वाहनचालक, पुस्तकबांधणीकार, शिपाई, पहारेकरी आणि सफाईगार यांसह पाच पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

याशिवाय, सरकारी वकील कार्यालयासाठी तीन नियमित पदे आणि एक बाह्य यंत्रणेमार्फत पद मंजूर करण्यात आले आहे. अशाप्रकारे न्यायालय व सरकारी वकील कार्यालयासाठी मिळून २३ नियमित आणि ६ बाह्य यंत्रणेमार्फत पदे, अशी एकूण २९ पदांची व्यवस्था करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे सिल्लोड व परिसरातील नागरिकांना जिल्हा व सत्र न्यायालयीन कामकाजासाठी दूरवर जावे लागणार नाही. स्थानिक पातळीवर न्यायसेवा उपलब्ध झाल्याने न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतिमान, सुलभ आणि परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.

००

**(विधि व न्याय विभाग)**

**चांदवड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय**

नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या न्यायिक अधिकारी व सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या पदांमधून या न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे एक पदासह २१ नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच शिपाई, पहारेकरी आणि सफाईगार या पदांसाठी चार मनुष्यबळांच्या सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे चांदवड व परिसरातील नागरिकांना वरिष्ठ स्तरावरील दिवाणी प्रकरणांसाठी दूरच्या न्यायालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही. स्थानिक पातळीवर न्यायालयाची सुविधा उपलब्ध झाल्याने न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतिमान, सुलभ आणि परिणामकारक होऊन नागरिकांना वेळेत न्याय मिळण्यास मदत होणार आहे.

००

(विधि व न्याय विभाग)

**किनवट येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासह सरकारी वकील कार्यालय, दिवाणी न्यायालय**

नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, सरकारी वकील कार्यालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या न्यायिक अधिकारी व सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या पदांमधून या तीनही आस्थापनांसाठी आवश्यक पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासाठी १९ नियमित व ६ बाह्य यंत्रणेमार्फत पदे, सरकारी वकील कार्यालयासाठी ३ नियमित व १ बाह्य यंत्रणेमार्फत पद, तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरासाठी २१ नियमित व ४ बाह्य यंत्रणेमार्फत पदे मंजूर करण्यात आली आहेत.

अशाप्रकारे या तीनही संस्थांसाठी मिळून ४३ नियमित आणि ११ बाह्य यंत्रणेमार्फत पदे, अशी एकूण ५४ पदांची निर्मिती करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे किनवट व परिसरातील नागरिकांना जिल्हा व सत्र न्यायालय तसेच वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालयाची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे न्यायालयीन कामकाजासाठी दूरवर जावे लागणार नाही, प्रकरणांच्या निपटाऱ्याला गती मिळेल आणि नागरिकांना अधिक सुलभ, जलद व परिणामकारक न्यायसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या न्यायालयांसाठी आवश्यक न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांची पदे त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

००

(विधि व न्याय विभाग)

**केज येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय**

बीड जिल्ह्यातील केज येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे एक पदासह २१ नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच शिपाई, पहारेकरी आणि सफाईगार या गट 'ड' संवर्गातील चार पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. अशाप्रकारे न्यायालयासाठी एकूण २५ पदांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

या न्यायालयासाठी आवश्यक खर्च न्याय व विधि विभागाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करून देण्यात येणार असून, निधी उपलब्धतेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

या निर्णयामुळे केज व परिसरातील नागरिकांना वरिष्ठ स्तरावरील दिवाणी प्रकरणांसाठी दूरवर जावे लागणार नाही. न्यायसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यास चालना मिळून नागरिकांना अधिक सुलभ, परिणामकारक आणि वेगवान न्यायसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

००

(विधि व न्याय विभाग)

**पिंपरी-चिंचवड येथे विशेष मोटार वाहन न्यायालय**

पिंपरी चिंचवड (जि. पुणे) येथे विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

पिंपरी-चिंचवड येथील प्रलंबित प्रकरणांची संख्या लक्षात घेता विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायाधीश यांनी सादर केला होता. त्यावर उच्च न्यायालयाच्या समितीनेही शिफारस केली. त्यानुसार आज न्यायालय स्थापन करण्यास, आवश्यक पदांना आणि त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात आली.

आवश्यक बारा पदांमध्ये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लघुलेखक श्रेणी-तीन, सहाय्यक अधीक्षक, वरिष्ठ लिपीक अशी प्रत्येकी एक आणि कनिष्ठ लिपीक पाच अशा एकूण दहा नियमित पदांना आणि शिपाई पदांच्या दोन पदांची भरती बाह्ययंत्रणेव्दारे करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी येणाऱ्या एक कोटी २७ लाख एक हजार ५३६ रुपयांच्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

मोटार वाहन न्यायालय, जिल्हा न्यायालय, पुणे येथे १ लाख २० हजार १२८ प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी ४७ हजार ८०६ प्रकरणे पिंपरी चिंचवडमधील आहेत. पिंपरी चिंचवड परिसराचा विस्तार वाढत आहे. त्याचबरोबर पिंपरी चिंचवड येथे स्वतंत्र वाहतूक शाखा आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय आहे. मात्र पिंपरी चिंचवड येथील प्रकरणातील नागरिकांना शिवाजी नगर, पुणे येथे जावे लागते. न्यायालयीन कामकाजासाठी शासकीय यंत्रणा आणि नागरिक यांच्यासाठी पिंपरी-चिंचवड येथील विशेष मोटार न्यायालय सोयीचे ठरणार आहे.

# मनातील पाऊस : भावप्रवास

बाहेर पडणारा पाऊस हा ऋतूचा असतो, पण मनात पडणारा पाऊस हा आयुष्याचा असतो. पाऊस म्हणजे फक्त आकाश आणि जमीन यांच्यातला संबंध नाही, तर तो आपल्या मनातल्या भावना, आठवणी, प्रेम, बालपण आणि आपल्या आतल्या संवादाचा एक सुंदर प्रवास आहे. आकाशात ढग जमले की आपल्या मनात जुन्या आठवणी दाटून येतात. प्रत्येकाच्या मनात एक वेगळा पाऊस असतो - कुणाच्या मनात आईचं प्रेम असतं, कुणाला पहिल्या प्रेमाची आठवण येते, कुणाला विरहाच्या आठवणी छळतात, तर कुणी स्वप्नांच्या दुनियेत रमून जातं. मग प्रश्न पडतो की, पाऊस खरंच आभाळातून पडतो की आपल्या मनातून? कोरडी जमीन जशी पावसाची वाट बघते, तसंच आपलं मन कोणाची वाट पाहतं? आपण पावसात भिजतो की आठवणींमध्ये? हे समजून घेणंच म्हणजे आपल्या मनातील पावसाचा खरा अर्थ शोधणं.

पाऊस कधीही दार वाजवत येत नाही, तो थेट हृदयात उतरतो. कधी पाऊस आपल्याला नुसतं भिजवतो, तर कधी पाऊस आपल्याला आतून घडवतो. आपलं मन हे एका कोरड्या विहिरीसारखं आहे, त्यात आठवणींचा पाऊस पडला की ते पुन्हा आठवणींनी भरून येतं. मन ही एक जुनी पेटी सारख, पाऊस येतो आणि उघडतो. मन हे ओसाड शेतासारखं आहे, जिथे पाऊस पडला की स्वप्नांची नवी पिके उगवतात. मन एका वाद्यासारखं आहे, ज्यावर पावसाचा प्रत्येक थेंब एक नवीन सूर वाजवतो. मन म्हणजे बंद खिडकी, जी पाऊस आल्यावर उघडली जाते.

पावसाचा प्रत्येक क्षण आपल्या भावनांशी जोडलेला असतो. आकाशातले ढग म्हणजे मनात साठलेल्या न बोललेल्या भावना. वीज चमकली की आठवते एखादी जुनी वेदना. ढगांचा गडगडाट म्हणजे मनातील अनुत्तरित प्रश्न. रिमझिम पाऊस म्हणजे शांत आठवणी, तर मुसळधार पाऊस म्हणजे भावनांचा उद्रेक. वेदनानंतर दिसणारं इंद्रधनुष्य म्हणजे पुन्हा प्रेमावरचा विश्वास. मातीचा सुगंध म्हणजे बालपणीच्या गोड आठवणी. कागदाची नाव म्हणजे आपली निरागस स्वप्ने. चिखल म्हणजे आयुष्यातले संघर्ष, तर सगळीकडे पसरलेली हिरवळ म्हणजे प्रत्येक संकटानंतरची नवी सुरुवात.

भारतीय साहित्य आणि परंपरेत पावसाला खूप महत्त्व आहे. कालिदासाच्या मेघदूतमध्ये ढग हे प्रेमिकांचे दूत बनतात. संत ज्ञानेश्वरांसाठी तो कृपेचा वर्षाव आहे, तर संत तुकारामांसाठी तो भक्तीचा पाऊस. बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, शांता शेळके, ग्रेस आणि इंदिरा संत यांच्या कवितांमध्ये पावसाने स्त्रीमन, विरह आणि मानवी भावना खूप सुंदरपणे मांडल्या आहेत. ज्याप्रमाणे ढग रडल्यामुळे धरती हिरवीगार होते, त्याचप्रमाणे माणूस रडल्यावर त्याचं मन हलकं होतं. लहानपणी आपण पाण्यात कागदी नाव सोडायचो, तसंच मोठे झाल्यावर आपण आयुष्यात स्वप्ने सोडतो. या दोन्ही गोष्टी पाण्यातच आणि अनिश्चिततेतच चाललेल्या असतात. कोरडी जमीन जशी पहिल्या पावसात सुगंध देते, तसंच दुःखाने भिजलेलं मन जगण्याला खरी करुणा आणि संवेदनशीलता देतं.

पाऊस आणि प्रेम यांचं नातं खूप वेगळं आहे. काही प्रेम श्रावण महिन्यासारखं सतत बरसणारं असतं, काही



राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील
मोबाईल ९८९०५७७१२८

धुक्यासारखं हातात न मावणारं, तर काही दवबिंदूसारखं क्षणभंगुर पण ज्यात संपूर्ण आकाश दिसतं. जेव्हा आयुष्यात विरह येतो, तेव्हा तो मनाचा खरा पावसाळा बनतो. डोळे आभाळ बनतात, शब्द ढग बनतात आणि आठवणी पावसाच्या धारा बनून कोसळतात. मला वाटतं जगातल्या सुंदर कविता, चित्रे आणि गाणी याच पावसाच्या वातावरणात जन्म घेतात.

आजच्या धावपळीच्या युगात आपल्याकडे माहिती खूप आहे, पण स्वतःच्या मनाशी बोलायला वेळ नाही. अशा वेळी पाऊस आपल्याला स्वतःकडे परत बोलवतो. बाहेरचा पाऊस एक दिवस थांबतो, पण मनात पडणारा पाऊस आयुष्यभर वेगवेगळ्या ऋतूंमध्ये बदलत राहतो. काही थेंब डोळ्यांतून ओघळतात, काही शब्दांतून कविता बनतात, काही शांततेत विरघळतात, तर काही नवीन जीवनाची हिरवळ घेऊन येतात. म्हणून आपल्या मनातील पावसाला जपणं गरजेचं आहे, कारण त्याच पावसामुळे आपल्यातल्या संवेदना वाढतात, सृजनशक्ती जन्माला येते आणि आपण अधिक संवेदनशील आणि परिपूर्ण माणूस बनतो.

पडणारा पाऊस हा ऋतूचा असतो,
मनातील ओलावा हा आयुष्याचा असतो;
सुखावणारी आठवण जर सोबत असेल,
तर प्रत्येक क्षण हा सहवासाचा असतो.

# बीडमधील व्हिडिओ, सुनेत्रा पवारांना 'गुंगी गुडिया' म्हणत काँग्रेसची बोचरी टीका; राष्ट्रवादीचा पलटवार, एकनाथ शिंदेंनीही सुनावलं

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वादाची ठिणगी पडली असून बीड दौऱ्यातील त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये, आमदार धनंजय मुंडे बोलता असताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार शांत बसलेल्या दिसत आहेत. त्यावरुन, काँग्रेसने सुनेत्रा पवार यांना गुंगी गुडिया म्हणत हिनवले, काँग्रेसने हा व्हिडिओ शेअर करत, सुनेत्रा पवार, अजून किती दिवस ''गुंगी गुडिया'' बनून राहतील? असा सवालही केला. आता, काँग्रेसच्या या टीकेला राष्ट्रवादी काँग्रेसकडून पलटवार केला जात आहे. तर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही काँग्रेसला जोरदार प्रत्युत्तर दिलंय.



काँग्रेस लोकांपासून दूर गेली आहे, त्यामुळे असे विधान येत आहे. मी काँग्रेस पक्षाला इंदिरा गांधींचा फोटो देणार आहे. विरोधकांनी अशीच त्यांच्यावर टीका केली होती आणि त्याच खणकर पंतप्रधान झाल्याचा इतिहास आहे. काँग्रेस चांगल्या लोकांच्या हाती नाही, पराभव पचविता येत नाही अशी ही लोक आहेत, अशा शब्दात सुनेत्रा पवार यांच्याबद्दल महाराष्ट्र काँग्रेसने केलेल्या टीकेला राष्ट्रवादीने प्रत्युत्तर दिले आहे. सुनेत्रा वहिनी पवार या प्रत्येक आठवड्यात मुंबई पुण्यात पत्रकारांसोबत संवाद साधतात, बीडमदील ती पत्रकार परिषद होण्याआधी त्यांनी अनेक उत्तर दिली होती. मात्र, काँग्रेसने संभ्रम निर्माण केला आहे, त्यामुळे यांचं हास्य झाले, अशा शब्दात सूरज चव्हाण यांनी पलटवार केला.

सुनेत्रा पवार यांच्यावरील टीकेनंतर अंजली दमानिया बोलल्या मला चांगले वाटले, महिला म्हणून त्यांना आदर आहे, त्यांचो सहकार्य असेच मिळो ही अपेक्षा. एक महिला उपमुख्यमंत्री म्हणून त्यांना आदर असावा, पण जो बदल झाला तो चांगला, असे म्हणत अंजली दमानिया यांनी केलेल्या ट्विटवरही सूरज चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली.

काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्याबद्दल गुंगी गुडिया म्हणत केलेल्या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उत्तर दिलय. काँग्रेसला हे शब्द वापरताना थोडी तरी मनाची नाही, तर जनाची वाटली पाहिजे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनींबद्दल असे बोलत आहेत, यांना लाडक्या बहिणींनी २०२६ मध्येच उत्तर दिले आहे, अशा शब्दात एकनाथ शिंदेंनी काँग्रेसवर पलटवार केला. तसेच, पद्मश्री डॉ. डी.वाय पाटील यांचे निधन अतिशय दुःखद घटना आहे, त्यांचे योगदान मोठे आहे. अजात शत्रू म्हणून ते होते. त्यांच्या निधनाने शिक्षण क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मी त्यांना श्रद्धांजली अर्पित करतो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलं.

गुंगी गुडिया? काय ही भाषा? एका पक्षाला ही भाषा शोभते का? पृथ्वीराज चव्हाण यांना ही भाषा योग्य वाटते का? असे प्रश्न करत अंजली दमानिया यांनी काँग्रेसच्या टीकेवरुन पलटवार केला. मी राष्ट्रवादी पक्षाविरुद्ध टोकाचं लढले, पण सुनेत्रा पवारांसाठी वापरलेले हे शब्द अतिशय चुकीचे आहेत. मी याचा तीव्र शब्दात निषेध करते, असेही दमानिया यांनी म्हटले.

काँग्रेस पक्षाने सुनेत्रा पवारांचा उल्लेख 'गुंगी गुडिया' असा करणे ही काँग्रेसची बौद्धिक दिवाळखोरी आहे. अजित दादांच्या पावलावर पाऊल ठेवत सुनेत्रा पवारांनी सकाळी ७ वाजता कामाला सुरुवात केली ते रात्री १० वाजेपर्यंत त्या लोकांचे प्रश्न सोडवत होत्या, त्यांच्या ह्या कामाने त्यांचे नेतृत्व सिध्द करून दाखवले आहे. सुनेत्रा पवारांच्या केलेल्या अपमानाबद्दल काँग्रेसने तत्काळ माफी मागावी अन्यथा त्यांच्याच भाषेत त्यांना उत्तर देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सक्षम आहे, असा शब्दातही राष्ट्रवादीच्या महिला नेत्यांनी पलटवार केला आहे.

## प्रा.प्रवीण सरवदे यांना पीएच.डी.प्रदान



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील होळ येथील भूमिपुत्र आडस येथील कला महाविद्यालयातील लोकप्रशासन विषयाचे सहाय्यक प्राध्यापक प्रवीण दत्तात्रय सरवदे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाकडून लोकप्रशासन विषयात पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली.

संशोधन मार्गदर्शक प्रा.डॉ. विलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन कार्य पूर्ण केले.

ग्रामीण विकास प्रशासनातील दलित वस्ती सुधार योजनेमधील लोकसहभागाचा विश्र्लेषणात्मक अभ्यास : विशेष संदर्भ बीड जिल्हा या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. लोकप्रशासन विषयातील अमरावती विद्यापीठातून पीएचडी पदवी संपादन करणारे पहिले संशोधक विद्यार्थी आहेत.

या यशाबद्दल त्यांच्या संस्थेचे रमेशराव आडसकर, प्राचार्य डॉ.अनिल किर्दंत, प्रकाश लगस्कर, प्रा.डॉ.सुरेश कांबळे, डॉ. हनुमंत सौदागर, सरपंच योगेश शिंदे, बाळासाहेब घुगे, रमेश पाटोळे, मिलिंद व्हावळे, प्रा.भैय्यासाहेब सरवदे, संदीप सरवदे आदींनी अभिनंदन केले आहे.

## आदित्य ठाकरेंनी दुसऱ्यांवर टीका करण्यापेक्षा स्वत:चा मतदारसंघ सांभाळावा!

**मुंबई :** बिहारमधील पोटनिवडणुकीतील पराभवावरून भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधणाऱ्या उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे (ऱ्गूू ींरहा) यांनी जोरदार पलटवार केला आहे. आदित्य ठाकरेंनी भाजपवर बोलण्यापेक्षा आधी स्वत:चा वरळी मतदारसंघ सांभाळावा, २०२९ ची निवडणूक त्यांना अत्यंत कठीण जाणार आहे, असा टोला राणे यांनी लगावला.

एका पोटनिवडणुकीतील पराभवाने विरोधकांना खूप आनंद झाला असला तरी जनमताचा नेहमीच आदर केला पाहिजे, असे सांगत नितेश राणे म्हणाले की, नुकतीच मुंबईत झालेली 'बेस्ट' पतपेढीची निवडणूक ठाकरे बंधूंनी एकत्र येऊन लढवली होती. मात्र, या निवडणुकीत त्यांचा दारुण पराभव झाला. दोन्ही ठाकरे एकत्र लढूनही तोंडावर आपटले, मग आता मराठी माणसाने यांना लाथ मारून हकलवून लावले असे आम्ही म्हणायचे का, असा सवाल त्यांनी केला. पश्चिम बंगालमध्येही भाजपचे सरकार आले असून आमचा मुख्यमंत्री तेथे बसला आहे, याची आठवणही त्यांनी या वेळी करून दिली.

राज्यात नव्याने लागू झालेल्या 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायद्याचे' स्वागत करताना नितेश राणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेचे कौतुक केले. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात दिलेले आश्वासन पूर्ण करत हा कायदा अधिवेशनात संमत करण्यात आला असून राष्ट्रपतींचीही त्याला मंजुरी मिळाली आहे. या कायद्यामुळे राज्यातील हिंदू माता-भगिनींकडे नावाने वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले.

# लोखंडी रॉड व दगडाने बापलेकाला मारहाण

## दोन तोळ्याची सोन्याची चैन ही चोरली;सहा जनाविरुद्ध गुन्हा नोंद

**केज/प्रतिनिधी :** येथील विठाईपुरमच्या उत्तर बाजूस रविवारी ( दि. २ ) सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान आरोपीनी संगणमत करून रस्त्याच्या कडेला मांडलेला पत्र्याच्या डब्बा उचलीत आसताना,तुम्ही डब्बा का? उचलीत आहात आसे विचारले आसता आरोपीतानी संगणमंत करून लोखंडी रॉड व दगडाने बाप, लेकांना मारून जखमी केले. व सत्यम लोहिया यांच्या गळ्यातील २ तोळे सोन्याची चैन चोरून घेतल्या प्रकरणी विष्णुदास लोहिया यांच्या फिर्यादीवरून ६ जनाविरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




रविवारी ( दि. २ ) सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान विठाई पुरामच्या उत्तरेस आसलेल्या ठिकाणी विष्णुदास लोहिया यांनी आरोपीना तुम्ही पत्र्याचा डब्बा का उचलत आहात? आसे विचारले असता, आरोपीने गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीस म्हणाले कि हि जागा आमच्या पंजोबाची आहे.

आसे म्हणुन विष्णुदास लोहिया याला जिवे मारा. मी वकीली व्यवसाय करतोय तुम्हांला कोर्टातुन सोडवतो. तुम्ही काही काळजी करू नका असे म्हणताच आरोपिंनी संगमत करून शिवीगाळ करीत,लोखंडी रॉडने फिर्यादीच्या पाठीत मारून दुखापत केली. हातातील दगड पाटीत मारून मुक्कामार दिला. फिर्यादीचा मुलगा सत्यम लोहिया हा माझ्या वडीलांना मारू नका आसे म्हणताच आरोपीनी त्यालाही चापटा,बुक्यांनी मारहान करुन त्याच्या गळ्यातील २ तोळे सोन्याची चैन चोरी करण्याच्या उद्देशाने हिसकावुन घेतली. तुम्ही काय बघतात, बाप, लेकांना जिवेच मारा अशी चिथावणी इतर तिघांना दिल्या नंतर त्या तिघांनीही फिर्यादी व साक्षीदारयांना दगडाने मारहाण केली. व डोक्यात लोखंडी रॉड मारून दुखापत केली म्हणुन विष्णुदास पापालाल लोहिया यांच्या फिर्यादीवरून केज पोलिसात सोनु दिलीप सुर्यवंशी, गोविंद राजाभाऊ सुर्यवंशी, मंगेश पांडुरंग भोसले सर्व रा. विठाईपुरम,कळंब रोड केज व इतर अनोळखी तिघे आशा सहा जनाविरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आसून, पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक आसद शेख हे पुढील तपास करीत आहेत.

# दुबईतील साईभक्त परिवाराकडून शिर्डी साईबाबांना सुवर्ण राम अक्षरांची देणगी; द्वारकामाईत पूर्ण झाले ? साई राम

**शिर्डी :** श्रद्धा आणि सबुरीचा महामंत्र देणाऱ्या साईबाबांवर देश-विदेशातील कोट्यवधी भाविकांची अढळ श्रद्धा आहे. साईभक्त आपल्या श्रद्धेपोटी विविध प्रकारच्या देणग्या साईचरणी अर्पण करत असतात. अशातच दुबई येथील एका साईभक्त परिवारानं पुन्हा एकदा साईबाबांच्या चरणी अनोख्या पद्धतीनं सुवर्णदान करून साईभक्तांचं लक्ष वेधून घेतलं आहे. दुबईतील परिवारानं यापूर्वी अर्पण केलेल्या ? साई या सुवर्ण अक्षरांनंतर आता राम नावाची दोन सुवर्ण अक्षरे साईबाबा संस्थानला देणगी स्वरूपात अर्पण केली आहेत.

? साई या सुवर्ण अक्षरांपुढे राम- दुबई येथील साईभक्त पवन आणि श्वेता कचरू तसेच प्रतीक व तमन्ना कचरू या परिवारानं काही महिन्यांपूर्वी सुमारे २७० ग्रॅम वजनाची आणि सुमारे २४ लाख रुपये किमतीची ? साई अशी दोन आकर्षक सुवर्ण अक्षरे साईबाबा संस्थानला अर्पण केली होती. ही सुवर्ण अक्षरे द्वारकामाईमध्ये साईबाबा ज्या पवित्र भिंतीला टेकून उभे राहत असत, त्या ऐतिहासिक स्थळी संस्थानच्या वतीने प्रतिष्ठापित करण्यात आली होती. या सुवर्ण अक्षरांमुळे द्वारकामाईचे धार्मिक आणि आध्यात्मिक सौंदर्य अधिक खुलून आलं होतं. दररोज देश-विदेशातून लाखो साईभक्त शिर्डीत दर्शनासाठी येतात. दर्शनादरम्यान प्रत्येकाच्या मुखातून सहजपणे ? साई राम हा जयघोष उच्चारला जातो. हीच भावना मनात ठेवून कचरू परिवारानं ? साई या सुवर्ण अक्षरांपुढे राम ही सुवर्ण अक्षरेही असावीत, अशी इच्छा व्यक्त केली.

७६.३५० ग्रॅम वजनाची सुवर्ण अक्षरे- याच संकल्पनेतून दुबई येथील कचरू साईभक्त परिवारानं पुन्हा एकदा साईचरणी ७६.३५० ग्रॅम वजनाची, आकर्षक कलात्मक नक्षीकाम केलेली राम नावाची दोन सुवर्ण अक्षरे अर्पण केली आहेत. या सुवर्ण अक्षरांची किंमत १० लाख ३ हजार ६९७ रुपये इतकी असल्याची माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

ही सुवर्ण अक्षरे द्वारकामाईमध्ये यापूर्वी प्रतिष्ठापित करण्यात आलेल्या ? साई सुवर्ण अक्षरांसमोर बसविण्यात आली आहेत. त्यामुळे आता द्वारकामाईमध्ये ? साई राम हे संपूर्ण पवित्र नाम सुवर्ण अक्षरांत साकार झालं आहे.

विदेशात वास्तव्यास असूनही जपली श्रद्धा- दुबईतील साईभक्त परिवारानं ही सुवर्ण अक्षरे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते संस्थानकडे सुपूर्त केली. त्यानंतर संस्थानच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ती द्वारकामाईमध्ये प्रतिष्ठापित करण्यात आली.

## तरुणांनीच नेतृत्व करावं; मोहन भागवतांच्या युवा संवादावर अभिजीत दिपके यांची टीका

छत्रपती संभाजीनगर: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत युवकांशी संवाद साधणार असल्याच्या पार्श्र्वभूमीवर कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी टीका केली. उशिरा का होईना, युवकांशी संवाद साधण्याची गरज त्यांना कळाली, ही चांगली गोष्ट आहे. मात्र युवकांशी संवाद साधायचा असेल तर नेतृत्वातही तरुण चेहरे पुढे आणले पाहिजेत, असं ते म्हणाले. दिपके पुढे म्हणाले, जोपर्यंत तरुण आणि सुशिक्षित नेतृत्व पुढे येत नाही, तोपर्यंत अशा संवादाला फारसा अर्थ राहणार नाही. संवाद करणं चांगलं आहे, मात्र नवीन आणि सक्षम चेहरे पुढे आणल्याशिवाय पर्याय नाही.

...त्यांनी आम्हाला शिकवण्याची गरज नाही : यावेळी अभिजीत दिपके यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही टीका केली. ज्यांच्यावर महात्मा गांधी यांच्या हत्येशी संबंधित विचारधारेचे आरोप झाले आणि ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना विरोध केला, त्यांनी आम्हाला शिकवण्याची गरज नाही, असं दिपके म्हणाले. तसंच, प्रशांत किशोर यांच्यासारखा नवा चेहरा पुढे येत असेल, तर त्याचं स्वागतच आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

दोन दिवसांची कोअर कमिटी बैठक : कॉक्रोच जनता पार्टीची कोअर कमिटीची बैठक ५ आणि ६ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार असल्याची माहिती अभिजीत दिपके यांनी दिली. दिल्लीतील जंतर-मंतर आंदोलनानंतर काय साध्य झालं, त्यातून काय शिकायला मिळालं आणि पुढील वाटचाल कशी असावी, यावर बैठकीत चर्चा होणार आहे. याशिवाय संघटनेची भविष्यातील दिशा, संघटना अधिक मजबूत करण्यासाठी नेमकं कशा पद्धतीने पुढे जाणं गरजेचं आहे यावर चर्चा केली जाणार आहे. ६ ऑगस्ट रोजी बैठकीतील निर्णयांची माहिती माध्यमांना दिली जाईल. या बैठकीला संघटनेचे प्रमुख सदस्य आणि प्रवक्ते उपस्थित राहणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

इथेनॉल मिश्रित पेट्रोलला पूर्ण दर का? : दिल्लीत इथेनॉल मिश्रित पेट्रोलविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देणार का, असा प्रश्न विचारला असता दिपके म्हणाले, ''हा कोणत्याही एका पक्षाचा नाही, तर सर्वसामान्यांचा प्रश्न आहे. इथेनॉल मिश्रित पेट्रोलमुळं वाहनांचे इंजिन खराब होत असल्याच्या आणि मायलेज कमी मिळत असल्याच्या अनेक तक्रारी आमच्याकडं येत आहेत.'' ''जिथे जिथे या प्रश्नावर आंदोलन होईल, तिथं आमचा पाठिंबा असेल. जर इथेनॉल मिश्रित पेट्रोल विकलं जात असेल, तर त्यासाठी शंभर टक्के पेट्रोलचा दर का आकारला जातो?'' असा सवालही त्यांनी उपस्थित केलाय.

भाजपाला घाबरण्याची गरज काय? : शिवसेनेचे काही नेते भेटल्याच्या चर्चेवर बोलताना दिपके म्हणाले, ''मला दररोज अनेक लोक भेटायला येतात. एका ३० वर्षाच्या युवकाला भेटल्यामुळं एवढा गाजावाजा का केला जात आहे? भाजपाकडं ईडी, सीबीआय यांसारख्या यंत्रणा आहेत, मग त्यांना घाबरण्याचं कारण काय?'' ''जे नेते भेटायला आले, त्यांनी केवळ शुभेच्छा दिल्या आणि युवकांचे प्रश्न मांडल्याबद्दल अभिनंदन केलं. त्यापलीकडं कोणताही राजकीय अर्थ काढण्याची गरज नाही,'' असं त्यांनी स्पष्ट केलं.

झारखंडमधील विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा : झारखंडमधील विद्यार्थी आंदोलनाला कॉक्रोच जनता पार्टीचा पाठिंबा कायम राहील, असं दिपके यांनी सांगितलं. ''विद्यार्थ्यांना आंदोलनस्थळी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. बसण्याची आणि स्वच्छतागृहाचीही पुरेशी व्यवस्था नसल्याच्या तक्रारी आहेत. जंतर-मंतर आंदोलनादरम्यान आम्हालाही अशाच अडचणींना सामोरे जावं लागलं होतं.

# वरपगावचे भूमिपुत्र प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांना २०२६ राजर्षी शाहू महाराज नॅशनल अवार्ड प्रदान

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील वरपगाव गावचे भूमिपुत्र प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांना२०२६ चा राजर्षी शाहू महाराज नॅशनल अवार्ड प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल केज तालुक्यातील वरपगावचे भूमिपुत्र व महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष आणि शंकरराव मोहिते महाविद्यालय ,अकलूज चे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांना भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) त्यांनी राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय पुरस्कार २०२६ नुकताच पुणे येथे महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च शिक्षण संचालक व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातील बहुजन समाजातील सर्वसामान्य गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर व कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी ४५ वर्षपेक्षा अधिक काळ विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन व प्रेरणा देण्याचे काम केल्याबद्दल तसेच त्यांना वेळोवेळी आवश्यक ती सर्व मदत करून सामाजिक समानता व न्याय राष्ट्र बांधणीत भरीव योगदान दिल्याबद्दल हा बहुमान त्यांना देण्यात आला आहे. यापूर्वीही त्यांनी १९८० पासून ग्रामीण भागात ग्राम स्वच्छता , साक्षरता अभियान, व्यसनमुक्ती, रक्तदान, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन, मतदार नोंदणी, महिला सक्षमीकरण इत्यादी क्षेत्रात भरीव काम केल्यामुळे महाराष्ट्र शासनाने तीन वेळा राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. तसेच महिला सक्षमीकरण व महिला सुरक्षा यासाठी महाविद्यालय स्तरावर त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने शंकरराव मोहिते महाविद्यालय जिल्हास्तरीय १ लाख व विद्यापीठ स्तरीय २ लाख रुपये तसेच गौरव चिन्ह देऊन त्यांच्या कार्याचे दखल घेतली आहे. महाराष्ट्र शासनाच्या औरंगाबाद जिल्हा आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समितीवर सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी तसेच पैठण तालुका साक्षरता अभियान समितीचा वातावरण निर्मिती प्रमुख म्हणून ही त्यांनी भरीव काम केलेले आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याचे दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने २००७ मध्ये त्यांना राज्य शिक्षक पुरस्कार देऊन तर पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने २०१६ मध्ये उत्कृष्ट प्राचार्य म्हणून त्यांचा गौरव केला आहे. तसेच मनशक्ती केंद्र , लोणावळा, रोटरी क्लब अकलूज यासारख्या अनेक संस्थांनी वेळोवेळी त्यांना पुरस्कृत करून त्यांच्या कार्याचा




गौरव केला आहे. सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन, दिल्ली यांनीही आंतरराष्ट्रीय उत्कृष्ट प्राचार्य म्हणून रोख रुपये २५ हजार हजार व गौरव चिन्ह देऊन पुरस्कार देऊन त्यांचा दिल्ली येथे सन्मान केलेला आहे. सदर पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बौद्ध नगर येथील अभ्यासिका केंद्र (बौध्द विहार) च्या रखडलेल्या कामाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीच्या कारवाईची मागणी





**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर शहरातील बौद्ध नगर येथे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासिका (बौद्ध विहार) केंद्राच्या बांधकामाचे काम अनेक वर्षांपासून रखडले असून, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच अतिरिक्त निधी उपलब्ध करून काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे करण्यात आली आहे.

या संदर्भात काल व्हीएस पँथर चे संस्थापक विनोदभाऊ खटके,नगरसेविका तनुजाताई सिद्धार्थकुमार सूर्यवंशी व डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बौध्द नगर येथील महिला पुरूष व युवकांनी लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.

निवेदनात पूढे म्हटले आहे की, बौद्ध नगर येथील जुन्या समाजमंदिराच्या जागेवर अभ्यासिका (बौध्द विहार) केंद्र उभारण्याबाबत अनूसूचीत जाती उपयोजने अंतर्गत प्रस्ताव मंजूर झाला होता. यानिधीस मा.जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली असून न.प.ने निविदा काढून कामाचे कार्यादेश सूध्दा दिले होते.मात्र मध्यंतरी हे काम दिरंगाईमुळे व प्रशासकीय अनास्थेमूळे रखडले त्यामुळेच आजतागायत हा प्रकल्प पूर्णत्वास गेलेला नाही.

संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत निर्णय न घेतल्याने आणि बांधकाम प्रक्रियेत झालेल्या निष्काळजीपणामुळे अनुसूचित जातीसाठी च्या आलेला निधी खर्च केला नाही.उलट प्रशासक असताना उपजिल्हाधिकारी,संबंधीत मुख्याधिकारी व अभियंता यांनी अधिकाराचा दुरूपयोग करून हे काम रद्द करून इतर कामावर खर्च करण्याचा ठराव घेतला आहे.

या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, रखडलेले बांधकाम तातडीने सुरू करून पूर्ण करण्यासाठी आवश्यक अतिरिक्त निधी मंजूर करावा, काम पूर्ण करण्यासाठी निश्र्चित कालबद्ध कार्यक्रम आखावा आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी सांगितले की, बौद्ध नगर येथील मंजूर अभ्यासिका बौध्द विहाराचे काम होणे हा येथील नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. प्रशासनाने यापुढे कोणतीही दिरंगाई न करता सदरचे काम तातडीने पूर्ण करावे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल. असे नमूद करण्यात आले आहे.

## पंचायत समितीच्या सदस्यांच्या वतीने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील सहकारी साखर कारखानदारीत अव्वल स्थानी असलेल्या लातूरच्या विकास रत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्यास द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन यांच्या वतीने देण्यात येणारा बेस्ट शुगर फॅक्टरी हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल लातूर पंचायत समिती सदस्यांच्या वतीने कारखान्याचे चेअरमन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांची आशियाना निवासस्थानी मंगळवारी भेट घेवून शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले उपसभापती महेश चव्हान सन्माननीय पंचायत समिती सदस्य सर्वश्री बाळासाहेब कदम गुरुनाथ गवळी, बापुसाहेब चव्हाण, अमोल देडे, गणेश ढगे विलास उफाडे अक्षय देशमुख नितीन जाधव, जनक गायकवाड नामदेव उफाडे, संतोष स्वामी, अनिल कराड, सत्यनारायण पाटील भास्कर शिंदे आदि उपस्थित होते.

## संशयाचे भूत डोक्यात शिरले अन् घडला भयानक प्रकार! जळगावात पतीने अंगावर दारु ओतून पत्नीला...

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातून एक अत्यंत मन हेलावून टाकणारी आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीवरच दारू ओतून तिला जिवंत पेटवून देण्याचा प्रयत्न केला. पाचोरा तालुक्यातील 'वडगाव कडे' येथे ही थरारक घटना घडली असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप आणि खळबळ उडाली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संशयित आरोपी पती राजू किशोर तडवी हा आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर सतत संशय घेत होता. याच संशयातून त्यांच्यात वारंवार खटके उडत असत. घटनेच्या दिवशी आरोपी राजू याने पत्नीला अत्यंत घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करत बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता त्याने पत्नीला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर क्रूरतेची हद्द पार करत आरोपी राजू याने घरात असलेली दारू पत्नीच्या अंगावर ओतली आणि तिच्यावर पेटती काडी फ ेकून दिली. दारूमुळे क्षणात महिलेच्या कपड्यांनी पेट घेतला आणि ती आगीच्या ज्वालांमध्ये लपेटली गेली. वेदनेने व्याकुळ झालेल्या महिलेचा आक्रोश आणि आरडाओरड ऐकून आजूबाजूच्या नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी प्रसंगावधान राखून अथक प्रयत्नांनंतर आग विझवली.

## इन्स्टाग्राम च्या रीलच्या नादात गमावली सरकारी नोकरी!

**मुंबई/प्रतिनिधी :** बदलत्या जगासोबत आता शिक्षण व्यवस्था देखील बदलत चालली आहे. अनस्कुलिंग अन् नेचर स्कुलिंग सारख्या संकल्पा पुढे येत असताना आता एआयची एन्ट्री देखील शिक्षणव्यवस्थेत झालीये. अशातच राजकारणीच नाही तर शिक्षक देखील इन्स्टाग्रामसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ॲक्टिव झाले आहेत. अशातच आता तेलंगाणातील एका शिक्षिकेला इन्स्टाग्राम रील तयार करणे महागात पडले आहे. सरकारी शाळेत शिकवणाऱ्या या रीलस्टार शिक्षिकेला एक रील महागात पडली. भुक्या गौतमी असे या महिला शिक्षेकेचे नाव आहे. ही तेलंगणातील खम्मम येथील एका सरकारी शाळेत शिकत होती. मात्र, तिला आता राजीनामा द्यावा लागला आहे. तिला या वर्षाच्या सुरुवातीला निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर आता तिच्याकडे राजीनाम्याशिवाय पर्याय उरला नाही. तिला निलंबनानंतर पुन्हा कामावर रुजू झाल्यावरही त्यांना जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडून अत्यंत अपमान आणि छळाला सामोरे जावे लागले. त्यानंतर तिने व्हिडीओ शेअर करत थेट आपण राजीनामा देत असल्याचे म्हटले.

शिक्षिकेने रील शेअर करत काय म्हटले?

माझे आधारस्तंभ असलेले माझे पती! माझ्या विद्यार्थ्यांचे प्रेम! माझ्या अनुयायांचा विश्वास! मला वाटतं की या सर्व गोष्टींमुळेच मी इथंवर पोहोचले आहे आणि पुढं जात राहिले आहे. मी या व्यवस्थेत १२ वर्षे अत्यंत निष्ठेने काम केले आहे! वंचित मुलांना शिक्षण देण्याच्या उद्देशानेच मी शिक्षिकेची नोकरी स्वीकारली होती. मला अनेक अपमान आणि प्रचंड दबावाचा सामना करावा लागला, असं शिक्षिका म्हणाली. तरीही, मी लढा देत राहिले. मी पुस्तके दान केली आणि माझ्या यूट्यूब चॅनेलद्वारे शिक्षण दिले. इतकंच नाही, तर माझा चॅनेल दाखवून मी अनेक विद्यार्थ्यांना सरकारी शाळांमध्ये प्रवेश मिळवून देण्यातही मदत केली. मी माझी जबाबदारी पार पाडली. मी आता पूर्णपणे थकले आहे, असं शिक्षिकेने व्हिडीओमध्ये म्हटले आहे. आज एका कष्टाळू शिक्षिकेचा हा लढा संपला आहे. माझी कितीतरी स्वप्ने होती, पण अनावधानाने झालेल्या एका चुकीमुळे मला सम ाजात ट्रोलिंग, उपहास, तिरस्कार आणि अपमानाचा सामना करावा लागला. कठोर परिश्रम करणे हीच जणू माझी चूक ठरली; मुलांसाठी केलेले ते कष्टच माझ्यासाठी शाप ठरले, असं म्हणत शिक्षिकेने नाराजी बोलून दाखवली.

# डिजिटल युगात कायद्याचे भान ठेवा; चुकीच्या कृत्यामुळे भविष्य धोक्यात येऊ देऊ नका

## एसआरटीएमयू उपकेंद्रात 'पोलिस-विद्यार्थी संवाद' कार्यक्रम; पोलिस उपनिरीक्षक गोपाळ वराडे यांचे मत





**लातूर/प्रतिनिधी :** बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक तरुणाने कायद्याचे ज्ञान, सायबर सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारी यांचे भान ठेवणे अत्यावश्यक आहे. सोशल मीडियावरील चुकीची कृती, रस्त्यांवरील स्टंटबाजी, फेक आयडी, महिलांचा ऑनलाइन छळ तसेच अमली पदार्थांच्या विळख्यात अडकणे यामुळे आयुष्य आणि करिअर दोन्ही धोक्यात येऊ शकते. त्यामुळे कायद्याची योग्य माहिती घेऊन जबाबदार नागरिक म्हणून वागा, असे आवाहन पोलिस उपनिरीक्षक गोपाळ वराडे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या लातूर उपकेंद्रात आयोजित 'पोलिस-विद्यार्थी संवाद' कार्यक्रमात ते बोलत हो-ते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपकेंद्राचे संचालक प्रा. डॉ. शिवप्पा नागोबा होते. यावेळी सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. सागर कोंडेकर, सहाय्यक प्रा. अनिल जायभाये यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि डिजिटल पुराव्यांबाबत झालेल्या महत्त्व-पूर्ण कायदेशीर बदलांची माहिती देताना पोलिस उपनिरीक्षक गोपाळ वराडे म्हणाले की, ई-एफआयआर सुविधेमुळे नागरिकांना ऑनलाइन तक्रार नोंदविणे शक्य झाले आहे. मात्र, तक्रारदाराने तीन दिवसांच्या आत संबंधित पोलीस ठाण्यात जाऊन सही करणे आवश्यक आहे. दहा वर्षांपेक्षा कमी शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये ६० दिवसांच्या आत, तर गंभीर गुन्ह्यांमध्ये ९० दिवसांच्या आत आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्याची तरतूद करण्यात आली असून न्यायालयालाही निश्र्चित कालावधीत पुढील कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे व्हॉईस रेकॉर्डिंग, मोबाईलवरील धमक्या, व्हिडिओ, चॅट आणि मेसेजेस हे न्यायालयात महत्त्वाचे डिजिटल पुरावे म्हणून ग्राह्य धरले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच किरकोळ गुन्ह्यांसाठी प्रथमच सामुदायिक सेवा या शिक्षेची तरतूद करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

महिला व बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोक्सो कायदा अत्यंत कठोर असून, सोशल मीडियावर महिलांचा पाठलाग करणे, वारंवार फोन किंवा संदेश पाठवणे, फेक आयडी तयार करून छळ करणे अथवा बदनामी करणे हे गंभीर गुन्हे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऑनलाइन गुन्हे करणाऱ्या आरोपींपर्यंत पोहोचणे शक्य असल्याने, डिजिटल माध्यमातही कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पळवाट नसल्याचा इशारा त्यांनी दिला.

रस्त्यांवरील स्टंटबाजी, तल-वारीने केक कापणे, सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणे, मॉडिफाईड सायलेन्सरचा वापर करणे किंवा सोशल मीडियासाठी धोकादायक रील्स तयार करणे यामुळे फौजदारी गुन्हे दाखल होऊ शकतात आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह भविष्यातील करिअरवरही विपरीत परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

अमली पदार्थांचे सेवन व विक्री हे गंभीर आणि अजामीनपात्र गुन्हे असून, विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, चारित्र्य आणि सामाजिक बांधिलकी यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षितता, कायद्याचे पालन, महिला सन्मान आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी सक्रिय योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी संचालक प्रा. डॉ. शिवप्पा नागोबा यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहाय्यक प्रा. अनिल जायभाये यांनी केले. कार्यक्रमास उपकेंद्रातील प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षक नियुक्तीचे अधिकार शाळांनाच, संस्थाचालक संघातर्फे न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये केवळ मपवित्रफ पोर्टलमार्फतच शिक्षक नियुक्ती करण्याबाबत राज्य सरकारने काढलेल्या अध्यादेशाबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी महत्त्वाचा निर्णय दिला. मपवित्रफ पोर्टलमार्फतच शिक्षकांची नियुक्ती करणे शाळांना बंधनकारक राहणार असले, तरी त्यातील प्राधान्यक्रमाची सक्ती मात्र खंडपीठाने रद्द केली आहे. दरम्यान, लातूर जिल्हा संस्थाचालक संघातर्फे न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.

राज्य सरकारने २२ जून २०१७ रोजी काढलेल्या अध्यादेशात महाराष्ट्र खासगी शाळा शिक्षक व कर्मचारी नियमात सुधारणा केली. त्यानुसार, प्राथमिक शिक्षकांसाठी पात्रता आणि अभियोग्यता परीक्षा बंधनकारक करण्यात आली. तर, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाती शिक्षकांसाठी अभियोग्यता परीक्षा आवश्यक करण्यात आली. या अध्यादेशाला आव्हान देणाऱ्या याचिका नागपूरच्या स्त्री शिक्षण प्रचारक मंडळ व इतरांनी उच्च न्यायालयात दाखल केल्या, त्यावर न्या. रवी देशपांडे व न्या. विनय जोशी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

राज्य सरकार व याचिकाकर्त्यांची बाजू ऐकल्यानंतर खंडपीठाने दिलेल्या निर्णयात स्पष्ट करण्यात आले की, शाळा व्यवस्थापनाला मिळालेला शिक्षक नियुक्तीचा अधिकार अशा प्रकारे हिरावून घेता येणार नाही. नियुक्तीत निवड हा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे उमेदवार निवडण्याचा शाळा व्यवस्थापनाचा अधिकार अबाधित ठेवून अभियोग्यता चाचणी कायम ठेवण्यात यावी. त्या चाचणीतील गुणवत्ता यादीतील उमेदवारांना निवडण्याचा अधिकार शाळा व्यवस्थापनाला देण्यात आला. दरम्यान, न्यायालयाने दिलेल्या या महत्त्वपूर्ण निर्णयाचे लातूर जिल्हा संस्थाचालक संघाचे अध्यक्ष रामदास पवार, सचिव बाबुराव जाधव, कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, वसंतराव पाटील, उपाध्यक्ष जे. जी. सगरे, पी. एन. बंडगर, प्रकाश देशमुख, मधुकर पात्रे, शिवाजी परगे, राजेंद्र इंद्राळे यांनी स्वागत केले आहे.

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका यांच्या उपस्थितीत सेवाभावी अन्नदान उपक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे दाखल रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी सेवाभावी अन्नदान उपक्रमाचे आयोजन लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

श्री. भारुका आणि त्यांच्या पत्नी सौ. उमा भारुका यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात लातूर मुख्यालयातील न्यायाधीशांच्या अर्धांगिनींचाही सहभाग होता. शेकडो गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना सन्मानपूर्वक भोजनाचे वाटप करण्यात आले.

रुग्णालयात दीर्घकाळ उपचारासाठी थांबणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना भोजनाची सोय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मान्यवरांनी भोजन वाटपाबरोबरच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

यावेळी धर्मादाय सहआयुक्त विद्याधर मोरे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, प्रमिला भोसले, अश्रि्वनी जाधव, रंजना मोरे, चेतना पाटील तसेच कौसर जमादार उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी भोजन वाटपात सहभाग घेतला. भोजन स्वीकारल्यानंतर रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि या उपक्रमात सहभागी सर्व मान्यवरांचे आभार मानले.

## राज्यपालांच्या उपस्थितीत लोकभवनातील श्रीगुंडी यात्रोत्सवाला सुरुवात



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत झालेल्या पूजेने लोकभवन मुंबई परिसरातील पारंपरिक श्रीगुंडी देवी यात्रेला सुरुवात झाली. राज्यपालांनी देवी मंदिरामध्ये जाऊन देवीची पूजा व आरती केली. त्यानंतर त्यांनी मंदिर परिसरातील महालक्ष्मी, प्रभू राम व हनुमान यांच्या मूर्तींचे दर्शन घेतले. यात्रेनिमित्त मुंबई, ठाणे, पालघर व इतर परिसरातील अनेक कोळी बांधवांनी देवीचे दर्शन घेतले. राज्याचे बंदर विकास मंत्री नितेश राणे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी देखील श्रीगुंडी देवीचे दर्शन घेतले. लोकभवनातील श्रीगुंडी देवीला साकळाई देवी व सागरमाता या नावांनी देखील ओळखले जाते. गुरुपौर्णिमेनंतर येणाऱ्या पहिल्या मंगळवारी लोकभवन परिसरात ही एकदिवसीय यात्रा भरते. पोलीस दलातर्फे यात्रेसाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.